**Scholarly Research Journal for Humanity Science & English Language,**
**Online ISSN 2348-3083, SJ IMPACT FACTOR 2021: 7.278, www.srjis.com**
PEER REVIEWED & REFEREED JOURNAL, AUG-SEPT, 2021, VOL-9/47

# महिला सशक्तीकरण आणि आनंदी शिक्षणात महिलांची महत्वपूर्ण भूमिका

**सारिका गौतम बहिरट, Ph. D.**

*एस . एन . डी . टी . शिक्षणशास्त्र महाविद्यालय पुणे*

**Paper Received On:** 25 SEPT 2021
**Peer Reviewed On:** 30 SEPT 2021
**Published On:** 1 OCT 2021

***Abstract***

*भारत सरकारने **2001** हे वर्ष महिला सबलीकरणाचे वर्ष म्हणून घोषित केले होते . स्त्रीयांच्या सबलीकरणासाठी राष्ट्रीय धोरण The National policy for the Empowerment of women हे **2001** मधे मंजूर करण्यात आले . कायदे व कल्याण कार्यक्रमाच्या माध्यमातून आर्थिक,सामाजिक,शैक्षणिक व राजकिय या सर्वच क्षेत्रामध्ये महिलांना पुरूषांच्या बरोबरीने हकक व दर्जा प्रदान करून देणे विकासासाठी संधी उपलब्ध करून देणे आणि स्त्री पुरूष असमानता नष्ट करणे या प्रकियेला स्त्री सक्षमीकरण म्हणतात . समाजात महिलांना स्वायत्त सक्षम करण्याच्या दृष्टीकोणातून अनेक अभियान राबविले जातात . पण खरच स्त्रिया "अबला" आहेत का ?मुळात भारतीय महिला कधी अबला नव्हतीच भारत हा नवदुर्गेची पूजा करणाऱ्या या संस्कृतीतील स्त्री शक्तीचा देश आहे . खर पाहता महिलांमध्ये निसर्गाकडून काही देणग्या पुरूषांपेक्षा जास्त आहेत . महिलांमध्ये सहनशिलता,नवनिर्माणक्षमता,संघप्रेरणा,सौदंर्यदृष्टी,बचत वृत्ती इत्यादी गुण पुरूषांपेक्षा जास्त आहेत . स्त्री ही देशाचे भविष्य ठरविणारी शक्ती आहे त्यामुळे ही शक्ती सुदृढ सक्षम आणि आनंदी बनविणे ही समाजाची जबाबदारी आहे .*

*Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com*

## प्रस्तावना

महिलांना शिक्षणाची संधी उपलब्ध झालेली आहे . परंतू हे शिक्षण आनंददायी असण गरजेचे आहे . ज्याचा सर्वाथाने अर्थ असा होईल की आनंदी राहण्यासाठी शिक्षण आवश्यक आहे . **31** जुलै **2019** रोजी दिल्ली येथे Happiness Education परिषद भरली होती . दलाई लामा यांनी आंनददायी अभ्यासकमाचे उदघाटन केले आणि दिल्ली प्रशासनाने आनंददायी अभ्यासकम इयत्ता **1** ते **8** साठी राबविण्यास सुरूवात केली . सध्याच्या परीस्थितीमध्ये आनंददायी शिक्षणाची गरज आहे . मानव जातीस कायमच शाश्वत सुखाची ओढ असते . सुखाची व्याख्या व्यक्तीपरत्वे बदलते प्रत्येक व्यक्ती केवळ बाहय

*Copyright © 2021, Scholarly Research Journal for Humanity Science & English Language*

सुखाच्या मागे लागला आहे. आधुनिक जीवन शैलीमध्ये सुख हरवत चालले आहे. परंतू सुख हे आंतरिक गोष्टीवर अवलंबून आहे. यासाठी योग्य वृत्ती, सकारात्मक दृष्टिकोन, आत्मचिंतन करण्याची गरज आहे. यासर्वांसाठी आनंददायी शिक्षणाची गरज आहे. सुखाचे भौतिक सुखाबरोबर मानसिक, भावनिक, सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक असे अनेक प्रकार पडतात. त्यामुळे कोणत्याही सुखाचा आपण स्वतंत्र विचार नाही करू शकत प्रत्येकाला या सर्व सुखांची गोळा बेरीज हवी असते.

मानवाचे सुख हे आपल्या नातेसंबंधात उत्कट प्रेमात व निखळ मैत्रित असते. सुखाचा उगम हा कुटुंबात होत असतो. कुटुंबातील व्यक्तीचे एकमेकांशी असणारे जिव्हाळयाचे प्रेमाचे संबंध हे खऱ्या सुखाचे स्त्रोत असतात. कुटुंबामध्ये स्त्री ची भुमिका ही अत्यंत महत्वाची असते. संसाररूपी रथाची दोन चाक म्हणजे स्त्री आणि पुरूष परंतू पुरूषाच्या बरोबरीने तीला मान दयावा ही साधी वृत्ती समाजात नाही याची सुरूवात खर तर कुटुंबापासून होण गरजेचे असते. स्त्री वर पुरूषांपेक्षा जास्त जबाबदाऱ्या असतात आणि त्या ती उत्तमरित्या पार पाडत असते. घरात राहणारी स्त्री आणि नोकरी करणारी स्त्री यामध्ये तफावत केली जात नाही तीला कायमच तीचे छंद, आवडी, नोकरी या आणि घर यामधे समतोल राखताना तारेवरची कसरत करावी लागते. भारत देशाला विकसीत बनविण्यासाठी महिला सबलीकरण आवश्यक आहे. स्त्री शक्तीचे आरोग्य, शिक्षण, संस्कार, स्वावलंबन हे चार आधारस्तंभ आहेत ते भक्कम करून सुराज्य राखण्यास मदत होई ल. पूर्वी मातृसत्ताक पध्दत अस्तित्वात होती परंतू कालखंडाने ती लोप पावली आणि पितृसत्ताक समाज उदयास आला आणि स्त्री कडे दुय्यम नजरेने पाहायला लागले. आज ही पुरूषांच्या बरोबरीने चालताना तिची दमछाक होते आई ही प्रत्येक अपत्याचा पहिला गुरू असते. ती एक स्त्री असते. तिच्या कडून ज्याप्रमाणे मूल्यशिक्षण,पर्यावरण शिक्षण,शांतता शिक्षण हे जस ती प्रभावी पणे रूजविते त्याचप्रमाणे आनंददायी शिक्षणासाठी स्त्रीचे शिक्षण आवश्यक आहे.

पुरातन कालखंडातच काय पण आजही आपण अनेक देवी देवतांची पुजा करतो. स्त्री रूपी अनेक देवींची पुजा केली जाते परंतू जीवंत स्त्री ची अनेक रूपे मग ती गर्भातील न जन्मलेली मुलगी असेल, एकतर्फी प्रेमातून बळी गेलेली प्रेयसी असेल, हुंडयासाठी छळ झालेली नववधू असेल, किंवा पतीच्या मृत्यूनंतर समाजाच्या अत्याचाराला बळी पडणारी विधवा असेल अशा अनेक जीवंत स्त्रीयांना मरण यातना सहण कराव्या लागतात. यासाठी कुटुंबातूनच तिच्यावर होत गेलेले संस्कार कारणीभूत ठरतात. अन्याय सहन करण्याचा संस्कार तर जणू ती आईच्या गर्भातूनच शिकून येते. समाजात अनेक उच्चशिक्षित स्त्रीया आज ही घरघुती

हिंसेला बळी पडतात किंवा कामाच्या ठिकाणी त्यांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. परंतू सध्या वेळ आली आहे अन्याय ला वाचा फोडण्याची यासाठी लग्नसंस्कारातील कन्यादान ही संकल्पना बदलण्याची वेळ आली आहे म्हणजे स्त्री ला पण आपले काही अस्तित्व आहे याची जाणिव होईल.

स्त्री ने जर प्रभावीपणे आणि खंबीरपणे जगाला सामेरे जायचे असेल येर्णा या अनेक पिढया घडवायच्या असतील तर त्याची पायाभरणी ही स्त्रीच्या आनंददायी शिक्षणामुळे झालेल्या सबलीकरणातून होई ल. र्ख या अर्थाने पाठयपुस्तकामधून मिळालेले ज्ञान व्यवहारात आणि दैनंदिन जीवनात वापरले जाई ल. स्त्रीयांना आत्मनिर्भयतेचे धडे लहानपणापासून दिले पाहिजे त्यांच्यातील सुप्त गुण ओळखता आले पाहीजे आणि आपल्या आवडीनिवडी कला गुण जोपासले पाहिजे. आपल्याला आंनद देर्णा या गोष्टी चे आजिवन अध्ययन करायला पाहिजे त्यामध्ये प्रेम,मैत्री,सहकार्य,कलास्वाद,संगीत,व्यायाम,मनःशांती यासरख्या अनेक गोष्टींचा समावेश आहे. स्त्रीयांच्या सबलीकरणाचे अनेक पैलू आहेत ज्यामधे तिचे आर्थिक,सामजिक,मानसिक ,भावनिक,सामजिक,नैतिक,शारीरिक सबलीकरण आवश्यक आहे. स्त्रीयांना एका वेळी विविध भुमिका बजवाव्या लागतात ती कोणाची मुलगी, कोणाची बहिण, कोणाची पत्नी, कोणाची मैत्रिण, कोणाची आई, कोणाची काकी, कोणाची मामी, कोणाची आजी, अशा एक ना अनेक भुमिका ती योग्य रितीने पार पाडते.

मुलांच्या जडणघडणीमधे स्त्रीयांची भुमिका ही पुरूषांच्या पेक्षा जास्त महत्वाची असते. ज्या घरात गृहलक्ष्मी सुखी आनंदी असते पर्यायाने संपूर्ण कुटूंब हे आनंदी जीवन जगत असते. त्यामुळेच स्त्रीयांच्या सर्वा गिण विकासाकडे लक्ष देणे आवश्यक आहे. स्त्री ही केवळ उपभोग्य वस्तू नाही तर तीला पण तिचे स्वतंत्र अस्तित्व आहे हे प्रत्येक स्त्रिने ओळखण्याची गरज आहे. अस म्हटल जात "जिच्या हाती पाळण्याची दोरी ती जगाचा उदधार करी" कारण एका वेळी अनेक गोष्टी करण्याची किमया तिच्याकडे आहे. तीच निर्माती आहे तिच्या मधे जशी नवनिर्माण क्षमता आहे तशीच ती वेळप्रसंगी महिषासुरमर्दिनी ही होवू शकते. स्त्रियांनी आज असे एक पण क्षेत्र नाही जेथे पाऊल ठेवले नाही. अस ही म्हटल जात की स्त्री च स्त्री ची वैरिण असते......पण समाज बदलत चाललाय स्त्री पण स्त्रीची मैत्रिण होऊ शकते यातूनच सासू सुनेच्या नात्याकडे आज सकारात्मक भावनेने पाहिले जाते.

महिला आणि पुरूषांमधे स्पर्धा नाही तर त्या दोघांनी मिळून सर्व गोष्टी केल्या तर कलह वाद संपूष्टात येतील याची सुरूवात ही घरातून होण गरजेचे आहे.

लहानपणा पासून ती आणि तो हा लिंगानुसार होणारा फरक काढून टाकावा दोघांनाही समान वागणूक दयावी .

तो बाहेर जातो म्हणून त्याला मान ही काय घरातच असते अशी धारणा संपुष्टात येवून तिच्याकडे home maker या भावनेने पाहण्याची दृष्टी शिक्षणाने दिली .

तिला जर तिच्या कामाचा मोबदला दयायच ठरवल तर सर्वाधिक वेतन तिला असेल . शालेय स्तरावर देखिल अभ्यासक्रमांतर्गत असर्णा या अनेक विषयांमधून स्त्रियांनी पादाकांत केलेली क्षेत्र त्यांची कामगिरी त्यांना आलेल्या अडचणी यांची माहिती जगासमोर ठेवली त्यामुळे अनेक व्यक्तींना प्रेरणा मिळेल .
देशाचा प्रथम नागरिक होण्याचा मान देखिल स्त्रियांनी स्व कष्टाने जिददीने मिळविलेला आहे . सहजासहजी काही मिळणार नाही आपल्याला संघर्ष करावा लागणार आहे . प्रवास खडतर किंबहूना काटयांनी भरलेला आहे अशी धारणा ठेवून जर प्रवास सुरू केला तर अंतिम उद्यिष्ट साध्य करण सोप जात .

स्त्री ही कुटूंबातील अत्यंत महत्वाची व्यक्ती असते . ती संपूर्ण कुटूंबाला जोडून ठेवण्याची महत्वपूर्ण जबाबदारी पार पाडते . घरातील स्त्री जर हसरी आंनदी असेल तर पर्यायाने संपूर्ण कुटूंब आनंदी असते . शिक्षणाने संकुचित वृत्ती कमी होते तिच्या मध्ये आत्मविश्वास निर्माण व्हावा यासाठी शिक्षण ते पर्या याने आनंदाने शिक्षण होणे गरजेचे आहे . आनंददायी शिक्षण आणि महिला सबलिकरण हे वेगवेगळे विचार नाही करू शकत तर आनंददायी शिक्षणातून महिलांचे सबलिकरण होइल आणि सबलीकरण झाल्याने शिक्षण आनंददायी होऊ शकेल .

**उदिदष्टे**

- महिला सबलीकरणात महिलांची भूमिका जाणून घेणे .
- महिला सबलीकरणात पुरूषांची भूमिका जाणून घेणे .
- महिला सबलीकरणात कुटूंबाची भूमिका जाणून घेणे .
- महिला सबलीकरणात आनंददायी शिक्षणाची भूमिका जाणून घेणे .

**व्याप्ती**

सदर संशोधनात हे महिला सक्षमीकरण आणि आनंददायी शिक्षणाचा विचार केला आहे .

**मर्यादा**

सदर संशोधन हे केवळ शिक्षणशास्त्र महाविद्यालयात अध्ययन करर्णा या द्वितीय वर्षाच्या विदयार्थी नीचा विचार केला आहे .

*Copyright © 2021, Scholarly Research Journal for Humanity Science & English Language*

## पद्धती

सदर संशोधनासाठी सर्वेक्षण पद्धतीचा वापर केलेला आहे .

## साधने

सदर संशोधनासाठी प्रश्नावली या साधनाचा वापर केलेला आहे .

## नमूना निवड

सहेतूक नमुना निवड

शिक्षणशास्त्र महाविद्यालयात अध्ययन करणर्ा या द्वितीय वर्षाच्या विदयार्थीनीचा विचार केलेला आहे .

| अनु .क | विधान | होय | नाही | असल्यास... . उत्तराचे समर्थन करा |
|---|---|---|---|---|
| 1 | महिला सबलीकरण 100% झाले आहे का | 15% | 85% | अजूनही महिला स्वावलंबी नाहीत |
| 2 | महिला सबलीकरण म्हणजे काय | 95% | 05% | कायदे व कल्याण कार्यक्रमाच्या माध्यमातून आर्थिक सामाजिक शैक्षणिक व राजकीय सर्वच क्षेत्रामध्ये महिलांना पुरूषांच्या बरोबरीने हकक आणि दर्जा प्राप्त करून देणे |
| 3 | महिला सबलीकरणात महिलांची भुमिका महत्वाची आहे का | 100% | | महिला सबलीकरणात महिलांची भुमिका महत्वाची आहे |
| 4 | महिला सबलीकरणाचे विविध पैलू□ अंग कोणते | 100% | | शारिरीक मानसिक भावनिक बौध्दिक आर्थिक सामाजिक |
| 5 | महिला सबलीकरणात पुरूषांची भूमिका महत्वपूर्ण आहे का | 60% | 40% | महिला सबलीकरणात पुरूषांची भूमिका महत्वपूर्ण आहे |
| 6 | महिला सबलीकरणात कुटूंबाची भूमिका महत्वपूर्ण आहे का | 100% | | महिला सबलीकरणात कुटूंबाची भूमिका महत्वपूर्ण आहे |
| 7 | महिला सबलीकरणासाठी स्वातंत्र्यापूर्वी कार्य करणर्ा या व्यक्ती माहिती आहे का | 100% | | महात्मा फुले सावित्रीवाई फुले ताराबाई शिंदे पंडिता रमाबाई फातिमा शेख |
| 8 | महिला सबलीकरणासाठी स्वातंत्र्योत्तर कार्य करणर्ा या व्यक्ती माहिती आहे का | 20% | 80% | अरूणा रॉय मेधा पाटकर किरण वेदी अरूधंती रॉय |
| 9 | महिला सबलीकरणात महिला आयोगाची भूमिका काय | 25% | 75% | महिला सुरक्षा आणि महिलांवरील होणरे अत्याचार विरोधी कार्य करतात |
| 10 | महिलांसाठी असणारे विविध कायदे आपणास माहित आहेत का | 20% | 80% | समान वेतन<br>लैंगिक छळाविरोधी कायदा<br>संपत्तीमधे समान हिस्सा |
| 11 | महिलांसाठी असणर्ा या सोयी सुविधा माहित आहेत का व कोणत्या | 20% | 80% | वेटी बचाओ वेटी पढाओ वसतीगृह |
| 12 | महिला सबलीकरणासाठी आनंददायी शिक्षण आवश्यक आहे का | 80 % | 20% | काही विद्यार्थिनींना आनंददायी शिक्षण ही संकल्पना माहित नाही |

## निष्कर्ष

- बहुतांश विद्यार्थिनींच्या (**85%**) मते महिलांचे सबलीकरण **100%** अजूनही झालेले नाही.
- सर्वच विद्यार्थिनींच्या (**100%**) मते महिलांच्या सबलीकरणात महिलांची भुमिका ही महत्वाची आहे.
- बहुतांश विद्यार्थिनींच्या (**60%**) मते महिला सबलीकरणात पुरूषांची भूमिका महत्वपूर्ण आहे.
- सर्वच विद्यार्थिनींच्या (**100%**) मते महिला सबलीकरणात कुटूंबाची भूमिका महत्वपूर्ण आहे.
- सर्वच विद्यार्थिनींना (**100%**) महिला सबलीकरणासाठी स्वातंज्यापूर्वी कार्य करर्णा या व्यक्ती माहिती आहे.
- बहुतांश विद्यार्थिनींना (**80%**) महिला सबलीकरणासाठी स्वातंज्योत्तर कार्य करर्णा या व्यक्ती माहिती नाहीत.
- बहुतांश विद्यार्थिनींना (**75%**) महिला सबलीकरणात महिला आयोगाची भूमिका काय असते याबाबत माहिती नाही.
- बहुतांश विद्यार्थिनींना (**80%**) महिलांसाठी असणारे विविध कायदे आपणास माहित नाहीत
- बहुतांश विद्यार्थिनींना (**80%**) महिलांसाठी असर्णा या सोयी सुविधा माहिती नाहीत.
- बहुतांश विद्यार्थिनींना (**80%**) महिलांसाठी आनंददायी शिक्षण ही संकल्पनाच माहिती नाही.

## शिफारशी

- महिलांच्या सबलीकरणासाठी महाविद्यालयात विविध उपकमाचे आयोजन करणे आवश्यक आहे.
- महिलांच्या सबलीकरणात महिलांची भुमिका ही महत्वाची आहे हे पटवून देण्यासाठी काही वक्त्यांची व्याख्याने आयोजित करणे आवश्यक आहे.
- कुटूंबातील व्यक्तींना महिलांच्या अस्तीत्वाची जाणिव करून देण्यासाठी त्यांची प्रगती वेळोवेळी निदर्शनास आणून देणे गरजेचे आहे.
- महिला आयोगाने महिलांसाठी केलेले कायदे तसेच त्यांचे कार्य हे तक्त्यांच्या माध्यमातून सर्वासमोर राहील अशी व्यवस्था करावी.
- महिलांसाठी असणारे कायदे त्या संदर्भात माहिती विविध व्याख्यानमालांच्या माध्यमातून दयावेत तसेच कायदेतज्ञाची नियुक्ती करावी.

*Copyright © 2021, Scholarly Research Journal for Humanity Science & English Language*

## संदर्भ

*कर्वे स्वाती* ***2003*** *संपादित स्त्री विकासाच्या पाऊलखुणा पुणे प्रतिमा प्रकाशन*

*भागवत विद्युत* ***2009*** *अनुवादित मानसशास्त्रातील लिंगभावाची शोधमोहीम पुणे डायमंड प्रकाशन*

*Das Sukanya (2013), Inclusive Empowerment of Indian Women; New Delhi; Regal publication*